कला अकादमी गोवा<br>पणजी–गोवा<br>कअ/काविवि/घु.कार्य.शा/२०२६–२०२७/११७७<br>दि.२०/०८/२०२६

**कृपया प्रसिध्दीसाठी**

कला अकादमीतर्फे जिल्हा पातळीवर घुमट आरती वादनाची कार्यशाळा आयोजित करण्याचे निश्चीत करण्यात आले आहे. घुमट आरती वादनाकडे युवा पिढीचा असलेला कल तसेच या कलेला अधिकाधिक उर्जितावस्था लाभावी जेणेकरुन गोमंतकीय संस्कृतीचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे.

सदर कार्यशाळेत या क्षेत्रातील जाणकारांकडून नवोदित युवा पिढीला धडे देण्यात येतील. घुमट वादनातील विविध पैलूंचा अभ्यास, वादनातील शास्त्रशुध्द, तंत्र व बारकावे आत्मसात करण्याच्या दृष्टीने या कार्यशाळा उपयोगी पडणार आहेत.

प्रारंभी कार्यशाळांचे कुशावती जिल्ह्यात विविध ठिकाणी सोयीस्कर अशी स्थळे बघून आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यशाळांत सहभागी होणा–या पथकांना तयारीसाठी कला अकादमीतर्फे वादन सामग्रीचा संच पुरवण्यात येणार आहे.

कुशावती जिल्ह्यातील तमाम घुमट प्रेमी पथकांनी कला अकादमीकडे संपर्क साधावा. या संदर्भातील विहित नमुन्यातील प्रवेशीका अर्ज कला अकादमीच्या स्वागत कक्षात तसेच कला अकादमीच्या **www.kalaacademygoa.co.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहेत.

या संदर्भातील आयोजन स्थळे व तारीख मागाऊन जाहीर करण्यात येणार असून या संधीचा लाभ घुमट वादक कलाकारांनी घ्यावा असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)<br>कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति,
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)